# प्रेस नोट

महाराष्ट्र शासनाचे सामान्य प्रशासन विभागाकडील शासन परिपत्रक संकिर्ण १९१६/प्र.क्र. ८३/१६ स्वा.सै. -१ मंत्रालय मुंबई -४०००३२ दि. २८ सप्टेंबर २०१६.

**"बेघर स्वातंत्र्य सैनिकांना घरासाठी र.रू. १० लाख अर्थसहाय्य देणेविषयी"** ज्या स्वातंत्र्य सैनिक व त्यांच्या हयात पत्नीला अजूनही स्वत:चे घर नाही अशा स्वातंत्र्य सैनिक व त्यांच्या हयात पत्नीला त्यांच्या राहत्या गावात घर घेण्यासाठी र.रू. १० लाखाच्या मर्यादेत अर्थसहाय्य उपलब्ध करून देणेचे प्रस्तावित करणेत आले आहे. त्यास अनुसरून बेघर स्वातंत्र्य सैनिकांची संख्या निश्चित होणेसाठी खालील निकषांनुसार जिल्हयातील लाभार्थ्यांकडून तहसिलदार यांचे मार्फत अर्ज मागविणेत येत आहेत.

१. ज्या स्वातंत्र्य सैनिक व त्यांच्या हयात पत्नीच्या नावे (स्त्री स्वातंत्र्य सैनिक असलेस तिच्या नावे किंवा तिच्या हयात पतीच्या नावे ) किंवा त्यांच्या निकटवर्तीयांचे नावे भारतात किंवा महाराष्ट्रात किंवा इतर देशात कोठेही स्वत:चे घर नाही.

**निकटवर्तीय** :- यामध्ये स्वातंत्र्य सैनिकांचा मुलगा आणि मुलगी त्याच्या नामनिर्देशनाच्या आधारे ज्या व्यक्तीस शासकिय नोकरी मिळाली आहे अशी व्यक्ती यांचा समावेश आहे.

२. राज्य शासनाकडून निवृत्तीवेतन घेणारे महाराष्ट्रातील स्वातंत्र्य सैनिक किंवा केंद्र शासनाकडून निवृत्तीवेतन घेणारे महाराष्ट्रातील स्वातंत्र्य सैनिक अर्थसहाय्यासाठी अर्ज करू शकतील.

३. स्वातंत्र्य सैनिक किंवा त्यांची पत्नी/ पती या पैकी एकजण हयात असणे आवश्यक आहे. ते किंवा त्याच्या नावाने त्यांचे निकटवर्तीय यांना अर्ज सादर करता येईल.

४. स्वातंत्र्य सैनिक व त्यांच्या हयात पत्नीच्या नांवे (स्त्री स्वातंत्र्य सैनिक असलेस तिच्या नावे किंवा तिच्या हयात पतीच्या नावे ) किंवा त्यांच्या निकटवर्तीयांकडे मागील दहा वर्षापासून स्वत:चे घर नाही या विषयीचा पुरावा म्हणून खालील कागदपत्रे सादर करणे आवश्यक राहील.

अ) स्वातंत्र्य सैनिकांच्या वडिलांचे ज्यावेळी निधन झाले त्यावेळी स्वातंत्र्य सैनिकांच्या वडीलांच्या नावे असलेल्या मिळकतीबाबतचा दाखला.

आ) वडीलोपार्जीत मिळकतीच्या वाटण्या झाल्यानंतर स्वातंत्र्य सैनिकांच्या वाटयास आलेल्या वडीलोपार्जीत मिळकतीबाबतचा दाखला.

इ) स्वातंत्र्य सैनिकांच्या निकटवर्तीयांच्या नावे असलेल्या मिळकतीबाबतचा दाखला.

ई) मागिल दहा वर्षापासून स्वातंत्र्य सैनिक किंवा त्यांच्या हयात पत्नी भाडयाच्या घरात रहात असल्याचा पुरावा म्हणून घर मालकाबरोबर झालेल्या नोंदणीकृत करारनाम्याची साक्षांकित प्रत.

५. स्वातंत्र्य सैनिक किंवा त्यांची हयात पत्नी यांनी किंवा त्यांच्या निकटवर्तीयांने महाराष्ट्रात कोठेही म्हाडा शिडको यांच्या गृहनिर्माण प्रकल्प योजनेचा किंवा शासनाच्या अन्य गृहनिर्माण प्रकल्प योजनेचा किंवा घर बांधणी योजनेचा यापुर्वी लाभ घेतला असल्यास ते अर्थसहाय्य मिळणेस अपात्र रहातील.

६. स्वातंत्र्य सैनिकांचा मुलगा किंवा मुलगी यांना किंवा स्वातंत्र्य सैनिकांच्या नामनिर्देशनाच्या आधारे ज्या व्यक्तीस शासकीय नोकरी मिळाले आहे. अशा व्यक्तीस शासकीय निवासस्थान मिळाले आहे. ते अर्थसहाय्य मिळणेस अपात्र रहातील.

७. स्वातंत्र्य सैनिक किंवा त्यांची हयात पत्नी किंवा त्यांच्या निकटवर्तीयांस यापूर्वी घरासाठी किंवा शेतीसाठी जमिन देणेत आली असलेस ते अर्थसहाय्य मिळणेस अपात्र रहातील.

८. स्वातंत्र्य सैनिकांस दोन किंवा दोन पेक्षा अधिक पत्नी असलेस, आणि अशा स्वातंत्र्य सैनिकाचा मृत्यू झाला असलेस त्याच्या पत्नीला केवळ एका घरासाठी अर्थसहाय्य मिळण्याकरीता अर्ज करता येईल.

वरील सर्व निशांचे पुर्ततेसह विहीत नमुन्यातील अर्जात प्रतिज्ञापत्रासह तहसिलदार यांचेकडे २८/०१/२०१७ च्या आत अर्ज करावा. विहीत अर्जाचा नमुना व प्रतिज्ञापत्राचा नमुना तहसिल कार्यालयात उपलब्ध होतील.